# मेट्रो ३ मार्गिकेच्या विस्ताराला गती

म. टा. प्रतिनिधी, मुंबई




## 'डीपीआर'साठी सल्लागाराची नियुक्ती करणार

कुलाबा ते सिप्झ मेट्रो ३ मार्गिकेचा दक्षिण मुंबईत नेव्हीनगरपर्यंत विस्तार करण्याच्या प्रक्रियेला गती मिळाली आहे. मेट्रो ३चा कफ परेड ते नेव्हीनगर असा विस्तार करण्यासाठी सविस्तर प्रकल्प अहवाल (डीपीआर) तयार करण्यासाठी सल्लागाराची नियुक्ती मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनकडून (एमएमआरसी) केली जाणार आहे. त्यासाठी 'एमएमआरसी'ने निविदा मागविल्या आहेत.

कफ परेड मेट्रो स्थानकापासून नेव्हीनगर हे सुमारे ३ किलोमीटर अंतरावर आहे. मेट्रो ३चा नेव्हीनगरपर्यंत विस्तार केल्यास या भागात राहणाऱ्या नौदल आणि लष्करी अधिकाऱ्यांच्या वसाहतीला थेट जोडणी मिळणार आहे. तसेच या भागातील सरकारी आणि निमसरकारी संस्थांना जोडणी मिळाल्यास तेथे प्रवास करणाऱ्या नागरिकांना त्याचा फायदा होणार आहे. त्यातून त्यांचा प्रवास सुखकर होईल. राज्य सरकारने मेट्रो ३चा नेव्हीनगरपर्यंत विस्तार करण्याची घोषणा अर्थसंकल्पात केली होती. त्यानुसार एमएमआरसीने या मेट्रो मार्गिकेच्या विस्तारासाठी पावले उचलली आहे. त्यामुळे या प्रक्रियेला आता वेग आला आहे.

एमएमआरसीकडून कफ परेड ते नेव्हीनगर असा सुमारे २.५ किलोमीटर अंतरापर्यंत या मार्गिकेचा विस्तार करण्याचे प्रस्तावित आहे. यासाठी २,५०० कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे, अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली. नेव्हीनगर येथे डॉ. होमी भाभा रस्त्यावरील टीआयएफआर संस्थेनजीक हे मेट्रो स्थानकं प्रस्तावित करण्यात आले आहे.

मेट्रो मार्गिकेच्या विस्तार प्रकल्पाचा सविस्तर प्रकल्प अहवाल, पर्यावरण प्रभाव मूल्यांकन आणि सामाजिक प्रभाव मूल्यांकन करण्यासाठी एमएमआरसीकडून सल्लागार नियुक्त केला जाणार आहे. यासाठी एमएमआरसीने निविदा मागविल्या आहेत. पुढील वर्षी मार्चपर्यंत सल्लागाराकडून डीपीआर तयार केला जाईल. त्यानंतर केंद्र आणि राज्य सरकारच्या परवानग्या मिळविल्या जातील. तसेच प्रकल्पासाठी निधी कशाप्रकारे उपलब्ध होईल हे निश्चित झाल्यावर प्रत्यक्षात या विस्ताराचे काम सुरू होईल, असेही अधिकाऱ्यांनी नमूद केले.

दरम्यान, या विस्तारानंतर पश्चिम उपनगरातील नागरिकांना मेट्रोने थेट नेव्हीनगरपर्यंत येता येईल. तसेच मेट्रो ३ मार्गिकेवर २८ स्थानके होतील. या मार्गाची लांबीही सुमारे ३५.५ किलोमीटर होईल.